पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

दिनांक :१६/०२/२०२१

# गडचिरोली पोलीस दल व जिल्हा प्रशासनाच्या वतीने आत्मसमर्पीत नक्षल युवक-युवतींकरीता रोजगार मार्गदर्शन मेळावा संपन्न

## ➢ आत्मसमर्पीतांना घरकुल व जात प्रमाणपत्राचे वाटप.

गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम व नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशिल असुन येथील आदिवासी नक्षल आत्मसमर्पीत युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने गडचिरोली पोलीस दलाने 'आत्मसमर्पीत नक्षल युवक-युवतींना' मार्गदर्शन मेळावा आज दिनांक १६/०२/२०२१ रोजी आत्मसमर्पीतांच्या नवजीवन वसाहत नवेगाव येथे आयोजित केला होता.

सदर रोजगार मार्गदर्शन मेळाव्याला जिल्हयातील ३२० आत्मसमर्पीत युवक-युवती उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा., मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुमार आशिर्वाद (भा.प्र.से.) सा. जि.प. गडचिरोली तसेच मा. सहाय्यक जिल्हाधिकारी श्री. आशिष येरेकर (भा.प्र.से.) गडचिरोली यांची लाभली. यावेळी आत्मसमर्पीतांना वाटप झालेल्या भुखंडावर घरकुलाचे बांधकाम पुर्ण झालेल्या घरांचे उद्घाटन करुन, त्यांना घरकुल प्रमाणपत्र व ८१ आत्मसमर्पीत सदस्यांना जात प्रमाणपत्र वाटप केले. कार्यक्रमात उपस्थित आत्मसमर्पीतांना मार्गदर्शन करतांना मा. सहाय्यक जिल्हाधिकारी श्री. आशिष येरेकर (भा.प्र.से.) यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आत्मसमर्पीतांचे कौतुक करतांना म्हटले की, आपण सर्व नक्षलच्या जहाल व हिंसक विचारसरणीचा त्याग करुन जे सुखी जीवन जगण्याचा निर्धार केला आहे ते स्तुत्य आहे. आमचे कार्यालय आत्मसमर्पीतांचे जात प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळणेकरीता विशेष प्रयत्न करण्यात येतील. जिल्हा प्रशासनाच्या वतीने आत्मसमर्पीतांच्या बचत गटांना विशेष प्राधान्य देवुन ज्या ज्या योजनांचा लाभ देता येईल, त्याचा पाठपुरावा करुन त्या आपणापर्यंत पोहचवण्याचा सदैव प्रयत्न राहील. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुमार आशिर्वाद (भा.प्र.से.) सा. यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकशाही मार्गाने एक समिती तयार केली जाईल. त्यामध्ये जिल्हा प्रशासन, पोलीस दल व समर्पीतांमधील काही व्यक्तिंचा सहभाग असेल. या समिती मार्फत दर महीन्याला विकासकामांचा आढावा घेतला जाईल. तसेच पंडीत दिनदयाल योजना, मेडीकल व इंजिनियरींगचे क्लासेस इत्यादीद्वारे विकासाभिमुख कार्य केले जाईल. उपस्थित आत्मसमर्पीतांना मार्गदर्शन करतांना मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा. यांनी सांगितले की, नक्षलमध्ये भरती झाल्यावर तिथे तुम्हाला सांगतात की, समर्पित झाल्यास तुम्हाला शासन कसलीही मदत करत नाहीत, पण

ते खोटं असुन, आम्ही तुमच्यासाठी सर्वतोपरी मदत करतो. त्यामध्ये कोणाला कुक्कट पालन, शेळी पालन, मत्स्य पालन, ज्यांच्या त्यांच्या शिक्षण व आवडीनुसार आम्ही तुम्हाला मदत करु. वाटप झालेल्या भूखंडावर जास्तीत जास्त घरे बांधण्यासाठी तसेच लाईट व पाण्याची व्यवस्था करुन दिली जाईल. दर महिन्याला विकासकामांचा आढावा घेतला जाईल तसेच इतर आत्मसमर्पितांसाठी सुध्दा पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाच्या वतीने असे आश्वस्त करतो की, जे काही आम्ही तुमच्यासाठी करु शकतो ते करु.

यावेळी कार्यक्रमास मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मनिष कलवानिया सा. (अभियान), मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख सा. (प्रशासन), जिल्हा प्रशासनाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा. यांच्या संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली आत्मसमर्पीतांच्या नवजीवन वसाहत नवेगाव येथे यशस्वीपणे पार पडला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आत्मसमर्पण शाखेचे प्रभारी अधिकारी श्री. गंगाधर ढगे व पोलीस अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.









